अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन पदाकरीता पितळी मोहोर बनविण्याबाबतच्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत....

महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

शासन निर्णय क्र MEDD-1306/32/2026-MMD(Aush-2)

गो. ते. रुग्णालय आवार इमारत, ९ वा मजला,

लो. टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ००१

दि.२१ जुलै, २०२६.

संदर्भ :-

आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.भांडार/पितळी सील/ शासन प्र/१३०/२०२६/३ ब दि. २९/०५/२०२६.

प्रस्तावना: -

आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, मुंबई यांनी संदर्भाधीन पत्रान्वये अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन पदाकरीता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील उपलब्ध तरतुदीतून पितळी मोहोर बनविण्यास व सदर रक्कम संक्षिप्त देयकातून अदा करण्यास मंजुरी देण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

त्यानुषंगाने आयुक्त, अन्न व औषध प्रशासन यांनी केलेल्या मागणीनुसार पितळी मोहोर बनविण्याबाबतच्या खर्चास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन, पदाकरीता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील उपलब्ध अनुदानातून पितळी मोहोर बनवून घेण्यास व त्यासाठी येणारा रक्कम रुपये ५,६७,५५७/- (अक्षरी रुपये पाच लाख सदुसष्ठ हजार पाचशे सत्तावन्न फक्त) इतका खर्च संक्षिप्त देयकातून अदा करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरहु खर्च खालील लेखांशीर्षअंतर्गत भागविण्यात यावा -

लेखाशिर्ष योजनाबाह्य वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग मागणी क्र.१ एस-१ २२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य ०६- सार्वजनिक आरोग्य (१०२)- अन्न भेसळ प्रतिबंध (०१) (०१) अन्न भेसळ प्रतिबंध करण्यासाठी आस्थापना (२२१०२७०१) (१३) - कार्यालयीन खर्च.

३. तसेच उपरोक्त खर्च करताना शासनाचे प्रचलित प्रशासकीय व वित्तीय नियमांचे काटेकोरपणे पालन करावे. सदरहु शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक १७/०४/२०१५ व वित्तीयअधिकार नियमपुस्तिका १९७८ मधील भाग पहिला उपविभाग दोन मधील अ.क्र.४५ नियम क्र. १६९ अन्वये, प्रशासकीय विभागाला प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदरचा शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०७२११४५४०२९५५५ असा आहे. हा शासन आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AJIT RAMESH JAGTAP

Digitally signed by AJIT RAMESH JAGTAP
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDD, 2.5.4.20=1C57E2746855B8B01D38F9CBD79DC87F2AF58135CF485D243D93EBF54C900920, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=62896254F9FECC7DA7B3BA8FDC28BAB4A5C1238D1090C223FD8574F24BA7CA52, cn=AJIT RAMESH JAGTAP
Date: 2026.07.21 15:52:34 +05'30'

(अजित जगताप)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. अपर मुख्य सचिव, औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. महालेखापाल-महाराष्ट्र (लेखा व अनुज्ञेयता / लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपुर
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
५. निवासी कोषागार अधिकारी, मुंबई
६. उपसचिव (अलेप), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
७. वित्त विभाग (विनियम / व्यय-१३)
८. निवड नस्ती (औषधे-२)